# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२३

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### पुणे जिल्ह्यातील भीमा-कोरेगाव येथे भीमा विजयस्तंभ उभारण्याबाबत

**(१) ७४६५ (१६-०३-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील भीमा-कोरेगाव येथे भीमा विजयस्तंभ उभारण्यासाठी आवश्यक लागणारी जमीन खाजगी मालकीची असल्यामुळे त्यांना योग्य मोबदला देऊन जमिनी ताब्यात घेण्याचा निर्णय दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विजयस्तंभासाठी किती जागा लागणार आहे व यावर किती खर्च येणार आहे, या विजयस्तंभाच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात येऊन ते केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन विजयस्तंभ हा मौजे पेरणे, ता.हवेली, जि.पुणे येथील ग.नं.१०३३ मध्ये ०३ हे.८६ आर एवढ्या जागेवर असून सदर जागेपैकी अंदाजे ०० हे.२० आर एवढे क्षेत्रावर विजयस्तंभाचे बांधकाम अस्तित्वात आहे. सदरच्या गट नं. १०३३ चा ७/१२ अधिकार अभिलेख्यानुसार कब्जेदार सदरी "जयस्तंभाकडे" अशी नोंद आहे. सदर जमीन प्रकरणी श्री.गुलाबराव बाबूराव जमादार माळवदकर यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र. ६३८८/२०१८ दाखल केली असून सदरचा दावा मा.उच्च न्यायालयात अद्याप न्यायप्रविष्ट आहे. सदर याचिका अंतिमत: निकाली काढण्याच्या दृष्टीने उचित कार्यवाही करण्याबाबत शासनाच्या दिनांक ११/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, पुणे यांना सूचित करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विदर्भ व मराठवाड्यातील जिल्हयांना ऑक्सिजन पुरवठा करण्याबाबत

**(२) ९२२५ (१८-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड-१९ महामारीमुळे शासनाने राज्याला ऑक्सिजनबाबत स्वयं:पूर्ण करण्याचा निर्णय घेतला असून प्रत्येक जिल्हा हा ऑक्सिजनबाबतीत परिपूर्ण करण्याचे नियोजन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यात प्रशासकीय यंत्रणेच्या अंमलबजावणीत त्रुटी राहिल्याचे निरीक्षण केंद्रीय उच्चस्तरीय पथकाने नोंदवले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा, सांगली, औरंगाबाद, बुलढाणा, नांदेड, भंडारा, पालघर, अमरावती, जालना व लातूर या जिल्ह्यामध्ये कोरोना संदर्भातील निर्बंधांचे पालन केले जात नसल्याचे आढळले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भातील अकोला, वाशिम व बुलढाणा तसेच मराठवाड्यातील हिंगोली व परभणी या जिल्ह्यांमध्ये इतर जिल्ह्यांच्या तुलनेत कोरोना रूग्णांची संख्या जास्त असून ऑक्सिजन पुरवठा वेळेवर न झाल्याने कोरोना रूग्णांकरीता अडचणी निर्माण झाल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर जिल्हयांसह संपूर्ण राज्यात ऑक्सिजन व कृत्रिम श्वसनयंत्राची कमतरता दूर करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

राज्यात कोविड संसर्गाच्या नियंत्रणाकरीता रुग्णांना अतिरिक्त ऑक्सिजनची गरज भासल्यास कृत्रिम ऑक्सिजनचा साठा वाढविण्याचा सूचना दिनांक २६/०६/२०२१ व दिनांक २०/०७/२०२१ रोजीच्या पत्राद्वारे सर्व जिल्हयांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच १०० पेक्षा जास्त खाटा असलेल्या रुग्णालयांना PSA Plant स्थापित करण्यासाठी दिनांक २३/११/२०२१ रोजी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

राज्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्ये १०% Type B व D सिलेंडरद्वारे, २०% PSA Plant द्वारे व उर्वरित ७०% LMO द्वारे ऑक्सिजन उपलब्धतेबाबत नियोजन केले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

विदर्भातील अकोला, वाशिम, बुलढाणा तसेच मराठवाड्यातील हिंगोली व परभणी या जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्ये कोरोना संसर्गित रुग्णांना ऑक्सिजन पुरवठा उपलब्ध झाल्याने, आक्सिजन अभावी अडचणी निर्माण झाल्याचे आढळून आले नाही.

(५) राज्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्ये १०% Type B व D सिलेंडरद्वारे, २०% PSA Plant द्वारे व उर्वरित ७०% LMO द्वारे ऑक्सिजन उपलब्धतेबाबत नियोजन केलेले असून त्यानुसार सद्य:स्थितीत राज्यातील आरोग्य संस्थेमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा करण्याकरीता ४८३ PSA Plant, १९९ लिक्विड मेडिकल ऑक्सिजन टँकची उभारणी करण्यात आली आहे. तसेच १० KL क्षमतेचे १४२ LMO Tank आणि २० KL क्षमतेचे २०० LMO Tank नव्याने स्थापित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात ऑक्सिजन निर्मितीबाबत करावयाच्या उपाययोजना

**(३) १०२२७ (२७-०९-२०२१) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात हवेतून ऑक्सिजन निर्मितीचे ३८ पीएसए प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्याद्वारे दिवसाला ५३ मेट्रीक टन ऑक्सिजन निर्मिती होत असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १२५० मेट्रीक टन ऑक्सिजन राज्यात उत्पादित होत असून कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा सामना करताना ऑक्सिजनची मागणी १७५० मेट्रीक टन एवढी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्य राज्यांमधून ऑक्सिजन आणण्यापेक्षा स्थानिक पातळीवरच ऑक्सिजन निर्मिती व्हावी यासाठी १५० पीएसए प्लांटचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ३५० प्लांट बसविण्याचे नियोजन असून त्याद्वारे ३५०० मेट्रीक टन ऑक्सिजन निर्मितीचे उद्दीष्ट असताना साखर कारखान्यांकडून ऑक्सिजन निर्मितीबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये माहे मे, २०२१ दरम्यान एकूण २१ PSA Plant कार्यान्वित असून त्याद्वारे दिवसाला १५.५६ मेट्रीक टन ऑक्सिजन निर्मिती करण्यात येत होती.
(२) हे अंशत: खरे आहे.

माहे मे, २०२१ दरम्यान कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा सामना करताना राज्यात एकूण १३०० मेट्रीक टन इतके ऑक्सिजनचे उत्पादन होते. तथापि, ऑक्सिजनची मागणी १८०० मेट्रीक टन इतकी होती.
( ३) हे अंशत: खरे आहे.

राज्यात कोविड संसर्गाच्या नियंत्रणाकरीता रुग्णांना अतिरिक्त ऑक्सिजनची गरज भासल्यास कृत्रिम साठा वाढविण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक २०/०६/२०२१ व दिनांक २०/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

तसेच १०० पेक्षा जास्त खाटा असलेल्या रुग्णालयांना PSA Plant स्थापित करण्यासाठी शासनाची अधिसूचना दिनांक २३/११/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

राज्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्ये १०% Type B व D सिलेंडरद्वारे, २०% PSA Plant द्वारे व उर्वरित ७०% LMO द्वारे ऑक्सिजन उपलब्धते बाबत उपाययोजना केलेल्या आहेत. सद्य:स्थितीत राज्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्ये ऑक्सिजनचा पुरवठा करण्याकरीता ५२३ PSA Plant उपलब्ध आहेत.

(४) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये सद्य:स्थितीत एकूण ५२३ PSA Plant ची उभारणी केली असून त्याद्वारे ५५२ मेट्रीक टन ऑक्सिजन निर्मिती होऊ शकते. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागास साखर कारखान्याकडून ऑक्सिजन निर्मितीबाबत उपाय योजना करण्याची गरज भासली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ४० टक्के महिलांना स्तन कर्करोग होण्याचा धोका असल्याबाबत

**(४) १२३३२ (३०-०३-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४० टक्के महिलांना स्तनाचा कर्करोग होण्याचा धोका असल्याचे एका अहवालातून दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५ टक्के महिलांना अनुवंशिक स्तन कर्करोगाचा उच्च धोका असल्याचेही या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेवून या आजाराला रोखण्याबाबत व महिलांमध्ये जागृती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २० ऑक्टोबर २०२१ रोजीच्या NCRP-२०२० च्या अहवालानुसार महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत स्तनाचा कर्करोग रोखण्यासाठी व जनजागृतीसाठी आशा व एएनएम व समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्रशिक्षण देऊन उपआरोग्य केंद्र स्तरावर सर्व महिलांची स्तन कर्करोग चाळणी तपासणी केली जाते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र /ग्रामीण रुग्णालय /उपजिहा रुग्णालय/जिल्हा रुग्णालय स्तरावर वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फ़त स्तन कर्करोग रुग्णांना कर्करोग उपचार केंद्रात संदर्भित करुन उपचार केले जातात. बाह्यरुग्ण विभागात विविध शिबीर, महिला आरोग्य अभियान अंतर्गत तसेच कर्करोग सप्ताहमध्ये महिलांची तपासणी, समुपदेशन स्वयंतपासणीबाबत मार्गदर्शन करण्यात येते व याबाबत सर्व आरोग्य संस्थांच्या ठिकाणी आईसी प्रदर्शित करण्यात आलेली आहे. तसेच अशासकीय संस्थांच्या मदतीने देखील कर्करोग निदान शिबीर आयोजित केली जातात. आशा स्वयंसेविका यांचे मदतीने संपूर्ण कार्यक्षेत्रात स्तनाचा व इतर कर्करोगाबाबत जनजागृती केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दाभा-आगरगांव-खापा निपाणी (ता.हिंगणा, जि.नागपूर) रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५) १३४७७ (२५-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाभा-आगरगांव-खापा निपाणी (ता.हिंगणा, जि.नागपूर) रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सन २०१९-२० मध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,करारनाम्यानुसार सदर रस्त्याचे रुपये १०.७५ कोटी खर्चाच्या डांबरीकरणाचे बांधकाम दिनांक २ जून, २०२० रोजीपर्यंत पूर्ण होणे आवश्यक असताना संबंधित कंत्राटदाराने एक ते दीड वर्षापासून रस्त्याचे काम अपूर्ण ठेवल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागातील नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी लेखी व मौखिक तक्रारी करूनही काम प्रलंबित असण्याची व हे काम अपूर्ण असूनही कंत्राटदारास दोन टप्प्यांत निधी देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२),(३), (४) व (५) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत नागपुर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील पॅ.क्र.८४ मध्ये ५ रस्त्यांच्या एकूण रुपये १०.०९ कोटी किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली आहे. यापैकी प्रश्नाधीन रस्त्याची लांबी ४.८९ कि.मी. असून रुपये २.९७५० कोटी इतकी प्रशासकीय मान्यतेची किंमत आहे. सदर रस्त्याचे काम खडीकरण स्तरापर्यंत पूर्ण झालेले असल्यामुळे वाहतुकीमुळे खडी विस्कळीत होऊन रस्त्याबाबत तक्रारी होत असल्यामुळे विस्कळीत खडीची व्यवस्थित दबाई करून रस्ता पृष्ठभाग वाहतूकीसाठी योग्य करण्यात आला. निविदा अटी व शर्तींनुसार कंत्राटदाराने केलेल्या कामाचे निधीच्या उपलब्धतेनुसार भुगतान करण्यात आले आहे. तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार सदरच्या रस्त्याचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याबाबत

**(६) १३६३५ (२५-०८-२०२२) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक १०७०२ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि यासाठी किती निधीची आवश्यकता आहे तसेच सदर प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१८-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणाऱ्या ९ जिल्ह्यांमध्ये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्याच्या प्रस्तावास दिनांक २८/०६/२०२३ रोजीच्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे. सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांसाठी अंदाजे रुपये ४३६५.७२ कोटी इतका निधी अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी आवश्यक असलेली पदे भरण्याबाबत

**(७) १४१६६ (२५-०८-२०२२) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात सन २०१९ मध्ये रुपये १५० कोटी खर्च करुन सुपर स्पेशालिटी रुग्णालय बांधण्यात आले असून दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही २०० बेडस्चे रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरु न झाल्याने नागरिकांना वैद्यकीय सुविधांचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयाकरीता आवश्यक असलेली विविध पद भरती प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अकोला जिल्ह्यातील सुपर स्पेशालिटी रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरु करुन आवश्यक असलेली विविध पद भरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

उपलब्ध मुनष्यबळात बाह्य रुग्णविभाग कार्यन्वित असून त्याद्वारे वैद्यकीय सेवा देण्यात येत आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

अतिविशेषोपचार विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरणेबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. त्यानुषंगाने आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार एकूण ४ अध्यापकांची अकोला येथील अतिविशेषोपचार रुग्णालयात सरळसेवेने नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच ३६ पदांबाबत उमेदवार उपलब्ध न झाल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे. त्यामुळे सदरहू पदे भरण्याची कार्यवाही नियमानुसार सुरू आहे. वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील पद भरती

प्रक्रिया संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संस्थास्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद येथे महिला कृषी महाविद्यालय स्थापन करणेबाबत

**(८) १५३१६ (२८-१२-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यातील जमीन अत्यंत सुपीक असून जायकवाडी, शिवना टाकळी, गिरजा-नांदूर, मधमेश्वर असे मोठे प्रकल्प जिल्ह्यात असल्याने शेतीला मुबलक पाणी मिळत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या औरंगाबाद परिसरातील मुलींना शेती विषयक ज्ञान उपलब्ध व्हावे व शेती सुधारण्यास पर्यायाने आर्थिक परिस्थिती सुधारण्यास उपयोग होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबाद येथे महिला कृषी महाविद्यालय स्थापन करणेसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांनी माहे मे, २०२१ रोजी कृषी परिषदेकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने सादर केलेल्या प्रस्तावास कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या दिनांक २ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता मिळालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने औरंगाबाद येथे महिला कृषी महाविद्यालय स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०७-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या दिनांक १३/०२/२०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत औरंगाबाद येथे महिलांसाठी कृषी महाविद्यालय स्थापन करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून कृषी परिषदेने शासनास शिफारस केली आहे. त्यानुषंगाने औरंगाबाद येथे शासकीय महिला कृषी महाविद्यालय स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर सादर करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बंद पडलेल्या सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करणेबाबत

**(९) १५९०३ (२८-१२-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण ९८ हजार ७८६ सहकारी संस्था नोंदणीकृत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यातील कामकाज होत नसलेल्या व केवळ कागदावर अस्तित्वात असलेल्या सहकारी संस्था समापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित सहकारी संस्थांची नोंदणी रद्द करण्याच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०४-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात एकूण नोंदणीकृत सहकारी संस्थांची संख्या (सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) १,०२,१९८ आहे.
(२) होय हे खरे आहे. सहकार आयुक्त व निबंधक, पुणे या कार्यालयाचे दिनांक १/०८/२०२२ च्या परिपत्रकानुसार दिनांक १५/०८/२०२२ ते दिनांक १५/०९/२०२२ या कालावधीत सहकारी संस्थांचे सर्वेक्षणाची विशेष मोहिम राबविण्यात आली होती. सदर माहिमेत कामकाज सुरु न केलेल्या बंद, कार्यस्थगित, कागदोपत्री अस्तित्वात असलेल्या, नोंदणीकृत असलेल्या व नोंदणीकृत पत्त्यावर आढळून न आलेल्या तसेच ठावठिकाणा नसलेल्या संस्थांचे सर्वेक्षण करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०व त्या खालील नियम १९६१ नुसार सदर संस्था अवसायनात घेवून त्यांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) वरील २ प्रमाणे.
(४ प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाल (ता.रावेल, जि.जळगाव) येथे शासकीय उद्यान विद्या महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(१०) १६१६५ (२८-१२-२०२२) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाल (ता.रावेर जि.जळगाव) येथे शासकीय उद्यान विद्या महाविद्यालय सुरु करण्यास सन २०१७ मध्ये मंजूरीसह जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महाविद्यालयाच्या बांधकामास अद्याप सुरुवात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत पाल, ता.रावेर, जि.जळगाव येथे शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्याबाबत महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे यांनी शासनास शिफारस केली होती. तथापि, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या १०१ व्या बैठकीत मा.मंत्री तथा

अध्यक्ष,कृषी परिषद यांनी शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय, पाल ऐवजी खिरोदा, ता.रावेर, जि.जळगाव येथील जागेची पाहणी करुन भारतीय अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या निकषानुसार परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत निदेश दिले आहेत. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे यांच्याकडून यासंदर्भातील प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बहुतांश ग्रामीण भागात दहन भूमी उपलब्ध नसल्याबाबत

**(११) १६३१८ (२८-१२-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: पालघर जिल्ह्यासह इतर ग्रामीण भागात बहुतांश दहन भूमीवर अतिक्रमण झाले असून काही दहन भूमीवर शेडची व्यवस्था नसल्याचेही निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अतिक्रमण निष्कासनाबाबत तसेच किमान सुविधा पुरविण्याबाबत दिनांक ५ जुलै,१९८८ व १५ जुलै, २००८ रोजी वा त्यासुमारास ग्रामविकास विभागाने परिपत्रक जारी केले आहे काय, त्यानुसार प्रत्येक गावात मूलभूत सुविधांसह किमान एक दहन भूमीची व्यवस्था करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील किती गावांत मूलभूत सुविधांसह दहन भूमीची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच सदर परिपत्रकांची अंमलबजावणीसाठी कालबध्द कार्यक्रम तयार करण्याचे शासनाने प्रस्तावित केले आहे काय,
(४) असल्यास, दांडाखाडी गाव परिसर (जि.पालघर) येथील पारंपारिक स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यासह सदर भागातील शासकीय जागेवर केलेले अतिक्रमण हटविण्याचे आदेश तहसिलदारांनी देऊनही त्याबाबत ग्रामपंचायत कार्यालयाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थ ग्रामपंचायत कार्यालयासमोरच अंत्यसंस्कार करत असल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील ग्रामीण भागातील स्मशानभूमीच्या नजिक असणाऱ्या रस्ता व जागेवर केलेले अतिक्रमण हटविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१७-०७-२०२३) :** (१) दहन भूमीवर अतिक्रमण झाले आहे असे निदर्शनास आलेले नाही परंतु, जिल्ह्यातील काही दहन भुमीवर शेडची व्यवस्था नाही, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. दिनांक १५ जुलै, २००८ रोजीच्या परिपत्रकानुसार ग्रामीण भागात दहन व दफन भूमीची व्यवस्था करण्याबाबत सर्वसमावेशक सुचना दिल्या असून, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी एकमेकांशी समन्वय साधून राज्यातील सर्व गावात दहन व दफन भूमीसाठी व्यवस्था करून देण्यासाठी सर्व प्राथम्याने कार्यवाही करतील, असे स्पष्ट केले आहे.
(३) पालघर जिल्ह्यात एकूण ९०४ महसूल गावे असून सद्य स्थितीत ६९३ महसुली गावांमध्ये दहन भुमीची व्यवस्था आहे. ३४ गावांमध्ये जागेअभावी दहन भूमी शेड उपलब्ध करता आले नाही. ३ गांवे ओसाड आहेत. उर्वरीत गावांमध्ये दहन भूमी शेड सन २०२२-२३ व सन २०२३- २४ मध्ये जनसुविधा योजनेमधुन

प्रस्तावित करण्यात आले आहेत.
(४) ग्रामपंचायत दांडा-खटाळी अंतर्गत मौजे दांडा व मौजे खटाळी ही दोन महसूल गावे आहेत. दोन्हीही महसूल गावांमध्ये ग्रामपंचायतकडून स्मशानभूमी बांधण्यात आलेल्या आहेत. बारी समाज पारंपारिकपणे करीत असलेल्या दहन भूमीच्या जागेकडे जाणारा रस्ता श्री.दिपक ठाकुर व इतर १ यांनी कुंपन करुन अडविल्यामुळे सदर कुंपण निष्कासित करणे बाबत तहसिलदार, तहसिल कार्यालय, पालघर यांनी दिनांक १७/८/२०२२ रोजी कळविले परंतु सदर जागेची मोजणी न झाल्यामुळे कुंपण कोणी निष्कासित करावे या बाबत संभ्रम निर्माण झाल्यामुळे ग्रामपंचायतला कुंपण काढता आले नाही. त्यामुळे मौजे-खटाळी येथील बारी समाजाच्या ग्रामस्थांना पारंपारिक खाडी किनारी क्षेत्रावर प्रेताचे दहन न करता आल्यामुळे ग्रामपंचायत दांडा- खटाळीच्या कार्यालया समोर प्रेताचे दहन करावे लागले, ही बाब खरी आहे
(५) मौजे खटाळी येथील बारी समाज हा पुर्वापार प्रेताचे पण दहन करीत असलेल्या खाडी किनारी जाण्याकरीता रस्त्यावर कुंपन घातले गेले होते. मात्र सद्य:स्थितीत बारी समाजाच्या पारंपारिक स्मशानभुमीकडे जाणे-येणेचा रस्ता मोकळा करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय आरोग्य सेवेतील आदिवासी दुर्गम व नक्षलग्रस्त भागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदोन्नती मिळण्याबाबत

**(१२) १६९६७ (२५-०३-२०२३) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय आरोग्य सेवेतील सुमारे ७१८ वैद्यकीय अधिकारी हे आदिवासी दुर्गम व नक्षलग्रस्त भागामध्ये अनेक वर्षापासून कार्यरत असून त्यांनी कोविड काळात उत्कृष्ट कार्य केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ग्रामीण, आदिवासी डोंगराळ व दुर्गम भागात प्रा. आरोग्य् केंद्रात १५ वर्षापासून काम करणाऱ्या गट –ब सवर्गातील वैद्यकीय अधिकारी पदोन्नती पासून वंचित असल्याचे दिनांक २६/१२/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गट –ब वैद्यकीय अधिकारी यांना शासन पदोन्नती देणार आहे काय,
(४) असल्यास, गत २३ वर्षापासून आजपर्यंत त्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध न झाल्याने तथा सन २०१९ मध्ये अस्थायी वैद्यकीय अधिकारी गट ‘ब’ मध्ये त्यांचे समावेशन करण्यात आलेले असून त्यांच्या पदोन्नती संदर्भात कार्यवाही अद्यापही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना पदोन्नती देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०७-२०२३) :** १) शासन अधिसूचना दिनांक ११/०१/२०१९ अन्वये सदर नियमातील अटी व शर्तीनुसार ७१८ अस्थायी वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस. यांचे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी, गट-ब (बी.ए.एम.एस.) या पदावर सन २०१९ मध्ये समावेशन झालेले आहे

(२), (३), (४) व (५) वैद्यकीय अधिकारी, गट-ब यांच्या पदोन्नतीच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६)प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय क्रीडा स्पर्धांना तातडीने अनुदान वितरीत करण्याबाबत

**(१३) १६९९८ (२५-०३-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय क्रीडा स्पर्धाना शासनाकडून अनुदान प्राप्त झाले नसून केंद्रस्तरीय, तालुका व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे अद्यापही आयोजन करण्यात आले नसल्याची बाब दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत दोन वर्षापासून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर क्रीडा स्पर्धा झालेल्या नसल्याने विद्यार्थ्यांचा हिरमोड झाला राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शालेय स्पर्धांचे आयोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शालेय क्रीडा स्पर्धांना तातडीने अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१३-०७-२०२३) :** (१), (२) व (३) शासनाच्या दिनांक १६/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२-२३ मधील राज्यस्तरापर्यंतच्या शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ३१/०३/२०२३ अन्वये शालेय क्रीडा स्पर्धच्या आयोजनासाठी रक्कम रुपये ९३०.८० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नालासोपारा (जि.पालघर) येथील महावितरण कंपनीकडून सतत वीज पुरवठा खंडित केला जात असल्याबाबत.

**(१४) १७३४६ (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा (जि.पालघर) येथे वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रकार व विद्युत दाब कमी-जास्त होण्याच्या प्रकारामुळे अनेक नागरिकांचे पंखे, टीव्ही व इतर वस्तूंचे नुकसान होऊन बंद पडल्यामुळे नालासोपारा परिसरात विजेचा पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्याबाबत महावितरण कंपनीने आवश्यक त्या उपाययोजना करणेबाबत दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.उप मुख्यमंत्री, मा.प्रधान सचिव, ऊर्जा यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर वीज योजनांची कामे पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

श्री.रुपेश कीर, समर्थन प्रतिनिधी यांनी नालासोपाऱ्यात सततच्या विजेच्या लंपडावाने विभागातील नागरिक त्रस्त असल्याबाबतचे निवेदन दिनांक २२/०९/२०२२ रोजीमा.उपमुख्यमंत्री यांना दिले आहे.

(२) नालासोपारा (जि.पालघर) येथील वीजपुरवठा सुरळीत राहणेकरीता महावितरण कंपनीतर्फे विविध योजनाअंतर्गत नवीन उपकेंद्र उभारणे, स्विचिंग केंद्र उभारणे, रोहित्र व वीज वाहिन्यांची दुरुस्ती देखभाल इ. कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. त्याअंतर्गत SSMR योजनेव्दारे उच्चदाब वाहिनी क्षमतावाढ,भूमिगत उच्चदाब वाहिनी टाकणे, नवीन उच्चदाब वाहिनी टाकणे, खराब झालेले पोल बदली करणे, नवीन रोहित्र टाकणे, नवीन लघुदाब वाहिनी टाकणे इ. असे एकूण ७.३८ कोटी रक्कमेची कामे करण्यात आलेली आहेत. तसेच प्रतिबंधात्मक दुरुस्ती देखभाली अंतर्गत लघुदाब/उच्चदाब वाहिनीचे पोल बदलणे, तारा बदलणे, गार्डींग/स्पेसर्स बसविणे इ. करीता २०२२-२३ वर्षात एकूण ४०.६७ लाख रुपये ची कामे करण्यात आली आहेत. वर्ष २०२३-२४ मध्ये सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत रुपये ३०.९० कोटीची विविध कामे प्रस्तावित असून त्याबाबत निविदाप्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील महसूल विभागात रिक्त असलेली पदे भरण्याबाबत

**(१५) १७३९६ (२५-०३-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात महसूल विभागातील १ हजार १५२ मंजूर पदांपैकी २५ टक्के पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील महसूल विभागात गत ४ वर्षापासून पदभरती न झाल्यामुळे ८१२ पदांवर कर्मचारी कार्यरत असून उपजिल्हाधिकारी २, तहसिलदार ६, नायब तहसिलदार १८, निम्नश्रेणी लघुलेखक ४,अव्वल कारकून ७, मंडळ अधिकारी ५, तलाठी ८७, महसूल सहाय्यक ७८, शिपाई २६ अशी एकूण २९१ पदे रिक्त असल्याने शासकीय कामासाठी येणाऱ्या ग्रामस्थांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने “झिरो पेडन्सी” मोहिम असफल झाल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रत्नागिरी जिल्ह्यातील महसूल विभागाचा कारभार सुरळीत होऊन कार्यरत असलेल्या कर्मचारी वर्गावर येणारा कामाचा अतिरिक्त ताण कमी व्हावा तसेच सामान्य नागरीकांना चांगल्या सोयी-सुविधा विनाविलंब मिळण्याच्यादृष्टीने रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०७-२०२३) :** १), २) व ३)

रत्नागिरी जिल्हा आस्थापनेवर माहे मार्च, २०२३ अखेर मंजूर १२३८ पदांपैकी ८१८ पदे भरलेली असून ४२० पदे रिक्त आहेत. तसेच, महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०७/१२/२०२२ अन्वये, रत्नागिरी जिल्ह्याकरीता नव्याने १८ मंडळ अधिकारी व १०३ तलाठी पुनर्रचनानुसार पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

राज्य शासनाच्या ७५ हजार पदे भरती मोहिमेअंतर्गत उप जिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, लघुलेखक निम्नश्रेणी, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, महसूल सहाय्यक व तलाठी संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने, थेट भरतीव्दारे आणि पदोन्नतीने भरण्याची प्रक्रीया सुरु आहे.

तसेच, प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी व जनतेची गैरसोय टाळण्यासाठी कार्यरत कर्मचाऱ्यांकडे रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

जिल्हास्तरावर सर्व उप विभागीय अधिकारी, तहसिलदार यांची मासिक आढावा बैठक घेण्यात घेऊन सदर बैठकीमध्ये प्रलंबित प्रकरणे तात्काळ निर्णीत करण्याबाबत सुचना देण्यात येतात.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्याबाबत

**(१६) १७५६६ (२५-०३-२०२३) अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन या मागणीसाठी संगणक परिचालकांच्या विविध संघटनांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास नागपूर येथे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास व माहिती तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून सुरू असलेल्या पूर्वीच्या संग्राम व सध्याच्या आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पात मागील ११ वर्षापासून ग्रामपंचायत स्तरावर संगणक परिचालक कार्यरत असून ग्रामीण भागातील सुमारे सहा कोटी जनतेला विविध प्रकारच्या सेवा अविरतपणे देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामविकास विभागाने स्थापन केलेल्या यावलकर समितीने सन २०१८ मध्ये सर्व संगणक परिचालकांना ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्याची मागणी शासनाकडे केली व या मागणीच्या अनुषंगाने दिनांक ११ मार्च २०२१ रोजी वा त्यासुमारास संगणक परिचालकांच्या मागण्या मान्य करण्याचे लेखी आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संगणक परिचालकांना ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.गिरीश महाजन (२४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) यावलकर समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने संगणक परिचालकांच्या मागण्यासंदर्भात तत्कालीन मा.मंत्री (ग्रामविकास) यांनी दिनांक ११ मार्च, २०२१ रोजी संघटनेला पत्र दिले आहे.

(४) ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या लोकसंख्या वाढीस अनुसरून आकृतिबंध सुधारण्याबाबत दिनांक २/०८/२०१७ च्या परिपत्रकान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांचे अध्यक्षतेखाली यावलकर समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालामध्ये संगणक परिचालक यांना

ग्रामपंचायतीचे कर्मचारी दर्जा देऊन त्यांना किमान वेतन देण्याबाबत शिफारस केलेली नाही. तथापि, सदर आकृतीबंधामध्ये लिपिक, वसूली कारकून किंवा डाटा ऑपरेटर हे पद पर्यायी म्हणून अंतर्भूत करण्यात आलेले आहे. त्यानुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांचे सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आला असता वित्त विभागाने त्यामध्ये काही त्रुटी उपस्थित केल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे शिराळ (ता.आष्टी, जि.बीड) श्री रामचंद्र देवस्थान न्यासाची जमीन अतिक्रमण करुन बळकावल्याबाबत येथे श्रीराम देवस्थान दादेगाव ची देवस्थान इनाम जमीन वर्ग-२ ची २५० कोटी रुपये किमतीची देवस्थानची जमीन अतिक्रमण करून हडप करण्याचा प्रयत्न झालेबाबत,**

**(१७) १७६६९ (२५-०३-२०२३) श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १५९८६ ला दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिराळ (ता.आष्टी, जि.बीड) येथे श्री.रामचंद्र देवस्थान यांच्या ताब्यात व वहिवाटीतील गट क्रमांक ११७, १२४, १२८, १२९, १३१, १३२, १३३, १३६, १३७, १३८. १४६, १५९, १६२, १६६, १७४, ७९, १८१, १९, २०५, २१, २१५, २३, २७, ३४, ३५, ३६, ४०, ४१, ४२ या जमिनी असून त्यामध्ये एकूण २७५.३८ हेक्टर आणि गट क्रमांक १५/१ मध्ये १०.४१ हेक्टर असे एकूण २८५.७९ हेक्टर जमिनीचे क्षेत्र म्हणजे सुमारे ७१४.४८ एकर जमीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर देवस्थान इनाम वर्ग-२ ची जमीन बाजारभावाप्रमाणे अंदाजे प्रति एकरी रुपये ३५ लक्ष याप्रमाणे एकूण रुपये २५० कोटी किमतीची असून सदर देवस्थान जमीन गट क्रमांक ४१, ४२, १५/१ चे मालक नसतानाही लोकप्रतिनिधींचे संबंधित बनावट कागदपत्रे तयार करून देवस्थानच्या संपादित जमिनीचे करोडो रुपयांचे उत्पन्न संगणमताने घेत असून देवस्थानाची व शासनाची फसवणूक करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाझर तलाव क्रमांक-२ या शासकीय प्रकल्पासाठी शासनाने संपादित केलेल्या जमिनीच्या मालकीचे पुरावे लोकप्रतिनीधी यांच्याकडे नसतानाही सदर जमिनीच्या मावेजाची मागणी भूसंपादन अधिकारी क्रमांक-२ बीड यांच्याकडे करण्यात आली असून मा.भूसंपादन अधिकारी क्रमांक-२ बीड यांनी सदरचे प्रकरण कुठल्याही मालकी हक्काच्या कागदपत्रांची शहानिशा न करता मा.न्यायालय, बीड यांच्याकडे वर्ग केलेआहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौजे शिराळ (ता.आष्टी जि.बीड) येथील गट क्रमांक १५,१८,४१व ४२ या जमिनीचे मालक नसतानाही श्रीमती रंजना रावसाहेब आजबे यांनी गैरव्यवहार करुन लोकप्रतिनिधींच्या संबंधित म्हणून सर्वाधिकारपत्राची नोंद मा.दुय्यम निबंधक कार्यालय, आष्टी यांच्याकडे दस्तक क्रमांक २५०३/२०१७ अन्वये केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, श्रीमती रंजनाबाई आजबे या देवस्थान जमिनीच्या मालक नसतानाही केवळ राजकीय दबामुळे खोटे कागदपत्रे सादर करून मा.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर बीड यांचे न्यायालयात प्रकरण एलऐआर नंबर ११७/२०१३ (रंजनाबाई रावसाहेब आजबे विरुध्द श्रीराम देवस्थान) मध्ये चंद्रकांत

भाऊसाहेब आजबे यांनी स्वत:च्या पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन सदरच्या नोंदणीकृत सर्वाधिकार पत्र दिनांक २५/०३/२०१७ अन्वये देवस्थान इनामी जमीनीचा मिळणारा मावेजा हस्तगत करण्यासाठी खोटा पुरावा सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, लोकप्रतिनिधी व त्यांचे संबंधित सदर देवस्थान जमीनीचा मावेजा संगणमताने हस्तगत करत असल्याने या प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करण्यासाठी तालुकाध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती, आष्टी ह्यांनी पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक,बीड यांचेकडे दिनांक १२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तालुकाध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती, आष्टी ह्यांनी केलेल्या तक्रारीनुसार संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०७-२०२३) :** (१) होय.
(२) हे खरे नाही. आज रोजी सदरहू जमीन श्रीराम देवस्थान यांचे नावे असून सदर जमिनीचे हस्तांतरण झालेले नाही.
(३), (४), (५), (६) व (७) मौजे शिराळ (ता.आष्टी, जि.बीड) येथील गट क्र.४१ मध्ये ०.९९ हे. आर., सर्व्हे नं.४२ मधील२.५२ हे.आर. आणि सर्व्हे नं.१५ मध्ये १.३१ हे. आर. क्षेत्र गाव तलावासाठी संपादित झाले आहे. संपादित झालेल्या जमिनीचा मावेजा मिळण्याबाबत देवस्थान ट्रस्ट, श्रीमती रंजनाबाई आजबे आणि श्रीमती उषाताई आजबे यांच्यामध्ये वाद सुरु आहे. भूसंपादन अधिकारी यांनी सर्व्हे नं. ४१ व ४२ मधील जमिनीची मावेजा रक्कम रुपये ६,९९,१९२/- मा.जिल्हा न्यायालय, बीड यांचेकडे दिनांक ८/०८/२०१३ रोजी जमा केली आहे. तसेच सर्व्हे क्र.१५ मधील जमिनीची मावेजा रक्कम रुपये २,९९,०५४/- ही दिनांक ११/०२/२०१३ रोजी मा.जिल्हा न्यायालय, बीड यांचेकडे जमा केली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण मा.जिल्हा न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधितांना मोबदला दिला जाईल.

---

## औढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील राजापूर,वाळकी,तळणी,जामराजा येथील शेतकऱ्यांना वीजपुरवठा सुरळीत होण्याबाबत

**(१८) १८३०९ (२५-०३-२०२३) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील राजापूर,वाळकी,तळणी,जामराजा येथील शेतकऱ्यांना वीजपुरवठा सुरळीत होत नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे महावितरणने 'एअर ब्रेकर' स्वीच बदलून विद्युत पुरवठा सुरळीत करण्याच्या मागणीसाठी येथील शेतकऱ्यांनी २८/१२/२०२२ रोजी येथील महावितरणने सहाय्यक अभियंता यांना निवेदन दिले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन औढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील राजापूर,वाळकी,तळणी,जामराजा येथील शेतकऱ्यांना वीजपुरवठा सुरळीत होण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तथापि, ११ के.व्ही. सुरेगाव कृषी वाहिनीवरील एक एअर ब्रेक स्वीच दिनांक २३/११/२०२२ रोजी नादुरुस्त असल्यामुळे सदर गावातील शेतकऱ्यांचा वीज पुरवठा काही वेळ खंडीत होता.

(२) हे खरे आहे.

वाळकी, जामराज, तळणी, राजापूर येथील शेतकऱ्यांनी महावितरणच्या सहाय्यक अभियंता, शाखा अभियंता, औढा नागनाथ यांना एबी स्वीच बदलून मिळणेबाबतचे निवेदन दिले होते.

(३)११ के.व्ही सुरेगाव कृषी वाहिनीवर एबी स्वीच दिनांक २९/१२/२०२२ रोजी महावितरणच्या सुचिबध्द कंत्राटदारामार्फत दुरुस्त करण्यात आला आहे.

(४)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आरोग्य विभागातील डॉक्टर्स, परिचारिका, वॉर्डबॉय इत्यादींसारख्या रुग्णालयातील आवश्यक असणारी पदे रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) १८५५१ (२५-०३-२०२३) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोव्हीड-१९ संसर्गामुळे आरोग्य सेवेचे महत्व अधोरेखीत झालेले असून माहे जानेवारी, २०२३ अखेर डॉक्टर्स, परिचारिका, वॉर्डबॉय इत्यादी रुग्णालयातील आवश्यक असणारी पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण संवर्गनिहाय किती पदे रिक्त आहेत,तसेच सदर रिक्त पदे भरण्याबात शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) असल्यास, कोरोना सारख्या भविष्यात उदभवणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी आरोग्य विभागामार्फत कोणती उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०६-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील आरोग्य विभागात गट-अ ते गट-ड संवर्गात एकूण ५७५२३ पदे मंजूर आहेत. त्यापैकी एकूण ३८६९१ पदे भरण्यात आली आहेत व एकूण १८८३२ पदे रिक्त आहेत.

तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कत्राटी पध्दतीने एकूण ४१८९५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३११६४ पदे भरण्यात आलेली असून १०७३१ पदे रिक्त आहेत.

(२)(३) राज्यातील आरोग्य विभागात गट-अ ते गट-ड संवर्गातील मंजूर भरलेल्या व रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| म.वै.आ.से. गट-अ (वरीष्ठ संवर्ग) व सामान्य राज्य सेवा, गट-अ | १७८४ | १००८ | ७७६ |
| वैद्यकीय अधिकारी, गट-अ | ८४४१ | ६२९० | २१५१ |
| वैद्यकीय अधिकारी, गट-ब | १२८५ | १०४७ | २३८ |

| | | | |
|---|---|---|---|
| सामान्य राज्यसेवा, गट-ब | ९९० | २४७ | ७४३ |
| गट-क | ३१९११ | २१९०२ | १०००९ |
| गट-ड | १३११२ | ८१९७ | ४९१५ |
| एकूण | ५७५२३ | ३८६९१ | १८८३२ |

सन २०२१-२२ या निवडसुची वर्षात जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील एकूण ३७२ अधिकाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश शासन स्तरावरुन निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्याच प्रमाणे सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्गातील एकूण १९५ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तर महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट -अ (एस -२३ व त्यावरील) मधील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ तसेच सामान्य राज्य सेवा या संवर्गातील शिफारस प्राप्त उमेदवारांचा तपशिल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपलब्ध करुन दिला असून त्यानुसार शिफारस प्राप्त उमेदवारांना सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सामाजिक न्याय विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत

**(२०) ३०१८९ (१३-०४-२०१७) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(२) असल्यास, वेतन सुरु केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची जिल्हानिहाय संख्या किती आहे व या सर्वांचे वेतन नियमित सुरु आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१८-०७-२०२३) :** (१) व (२) राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शासन निर्णय दिनांक २६/०६/२००८ नुसार मंजूर असलेल्या शिक्षकांच्या पदांवर नियुक्त केलेल्या व शासन नियमानुसार मान्यता मिळालेल्या उच्च माध्यमिक शिक्षकांना दरमहा वेतन अदा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.